(मासिक)

# नवे-गांव आंदोलन

## जन-गण-मन

प्रकाशन - दि. ५ एप्रिल २०१८



स्वातंत्र्य संग्राम स्मृती संस्था, शांतिनिकेतन लोकविद्यापीठ, सांगली । जुने वर्ष १५ वे अंक १ ला । नवीन - वर्ष २ रे अंक ४ था । पृष्ठे ३० । मुल्य रु.२०/-

# ‘कांताई’ची क्रांती...

**दिनेश दिक्षित,** (जैन इरिगेशन)
जळगाव, ९४०४९५५२४५



पाण्याचं मोल जाणून जैन उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी दुरदृष्टीकोन ठेवून गिरणा नदीवर ‘कांताई’ बंधारा बांधला. या बंधाऱ्यामुळे परिसरातील आठ ते दहा गावांचा पाणी प्रश्न मिटलाय. ‘कांताई’ बंधारा महाराष्ट्रातील पहिला असा बंधारा आहे, जो शासन आणि खासगी संस्थेच्या माध्यमातून बांधण्यात आला आहे. अवघ्या ९ महिने आणि ११ दिवसात पूर्ण झालेल्या या बंधाऱ्याविषयी...

जळगाव जिल्ह्याला तापी आणि गिरणा या दोन नद्यांचे वरदान मिळालेले आहे. पैकी गिरणा नदीच्या पाण्यावर जवळपास सात तालुक्यांची तहान भागत असते. मात्र या नदीवर मालेगांव तालुक्यात गिरणा धरण बांधलेले आहे. ते भरले तरच पुढे नदीत पाणी सोडले जाते. हे पाणी नदीतून पुढे आले तरच जळगाव जिल्ह्यातील गिरणा काठावरील शेतीची तहान भागते. त्यावरच या भागातील नागरिकांना पाणी देखील मिळते. पण पावसाचे प्रमाण अनियमित झाल्याने गिरणा धरणही आता भरण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे गिरणा नदीवर अवलंबून असलेल्या गावांत पाण्याचे दुर्भिक्ष्य मोठ्या प्रमाणावर जाणवू लागले आहे. ज्या-ज्या वेळी चांगला पाऊस होतो त्या त्या वेळी धरणातून निघालेले पाणी नदीतून पुढे वाहून जाते. ते कोठेही फारसे अडवले जात नाही. वाहून जाणारे पाणी अडवले तर त्याचा फायदा परिसरातील गावांना होईल, पाणी जमिनीत मुरेल आणि शेतकऱ्यांच्या शेतात समृद्धी नांदू लागेल..असा विचार डोळ्यासमोर ठेवून भवरलालजी जैन यांनी गिरणा नदीवर बंधारा बांधण्याचा निर्णय घेतला. त्याला मूर्त स्वरुप दिले. ‘कांताई’ बंधाऱ्यामुळे परिसरातील गावांमध्ये समृद्धीचे चित्र आपण पाहू शकतो. पाणी साठवले, जिरवले आणि योग्य पद्धतीने त्याचा वापर केल्यास निश्चितपणे चित्र पालटू शकते हा आशावाद भवरलालजी जैन यांनी जागवला.

गिरणा नदी असूनही पाण्याच्या दुर्भिक्ष्याला सामोरे जाणाऱ्या तसेच अवर्षणग्रस्त भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जळगाव तालुक्यातील नागझिरी परिसरात बंधारा बांधण्याचे निश्चित झाले. जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. च्या आर्थिक सहयोगाने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव अंतर्गत यासंदर्भात शासनाशी करार करण्यात आला. झालेल्या करारानुसार परिसरातील अल्पभूधारक, कोरडवाहू शेतकऱ्यांना ५० टक्के पाणी उपलब्ध झाले आहे.

बंधाऱ्यात उपलब्ध झालेल्या जलसाठ्यामुळे खेडी, कढोली, टाकरखेडा, वैदनाथ टाकरखेडा, मोहाडी, रिंगणगाव आदी परिसरातील आटलेल्या विहिरींना जलस्त्रोत मिळाला असून साधारणतः ३ ते ४ हजार एकर क्षेत्र या पाण्यामुळे सिंचनाखाली आले आहे. जल व्यवस्थापनाचे तंत्र वापरून शेतकऱ्यांना पाणी पुरविण्यावर भर आहे. पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा यासाठी ठिबकच्या वापरावर लक्ष केंद्रित आहे.

शेतीशी निगडीत विविध प्रकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करता यावा या दृष्टीने जैन इरिगेशनने आधुनिक आणि उच्च प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगभर विविध प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. याचसोबत सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून जैन इरिगेशनने अनेक अभिनव उपक्रम राबविले आहेत. भवरलालजींनी दुरदृष्टीतून सामाजिक बांधिलकीच्या कार्यक्षेत्रातही भक्कम योगदान दिले आहे. कांताई बंधारा हा त्याचाच एक भाग आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून बंधाऱ्यातील ५० टक्के पाणी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध झाले आहे. भविष्यात पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पाईपलाईनच्या माध्यमातून आधुनिक शेती करण्यासाठी नवी दिशा मिळाली आहे. आर्थिक उत्पन्न वाढविण्याची सुविधा उपलब्ध झाल्याबद्दल पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त

केला आहे. कांताई बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी आले आहे. पूर्वी जी मोटर अवघी पाच ते सात मिनिटे चालायची ती आता सात ते आठ तास सुरू राहत असल्याने साहजिकच उत्पन्न वाढले आहे. पाणी उपलब्ध झाल्याने कोरडवाहू क्षेत्र कमी झाले आणि बागायती क्षेत्राची वाढ झाली आहे. कांताई बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आली असून, त्यांचे जीवनमान उंचावले आहे.

बंधाऱ्याची ठळक वैशिष्ट्ये – जळगाव तालुक्यातील नागझिरी परिसरातील वाघूर नदीवर बांधण्यात आलेल्या या बंधार्याची पाणी क्षमता १७९.१८ कोटी असून याचे पाणलोट क्षेत्र ९१३.६१ चौरस किमी. एवढे आहे. या बंधार्याची लांबी गिरणेच्या पात्राप्रमाणे २४६ मीटर एवढी असून त्याची जास्तीत जास्त उंची ८.९२ मीटर एवढी आहे. हा बंधारा पुर्ण क्षमतेने भरलेला असताना याचे बॅकवॉटर सुमारे ५.६६० मीटर पर्यंत जाते. बंधाऱ्याच्या भिंतींची उंची साडेचार मीटर असून ८१ दरवाजे ठेवण्यात आले आहेत. सध्या या बंधाऱ्यात जलसाठा असून या मुळे परिसरातील विहिरी, बोअरवेल्सला पाण्याचा स्त्रोत मिळाल्यामुळे लगतच्या गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे, तसेच या पाण्यामुळे बागायतीक्षेत्रात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात भर पडणार आहे. एकूणच या बंधाऱ्यामुळे कृषीक्रांतीला चालना मिळाली असल्याने पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आहे.

निसर्गसृष्टीचं अव्दितीय रुप – उंच-सखल आणि गर्द हिरव्या आमराईच्या कुशीत वसलेल्या कांताई बंधाऱ्याचा परिसर हिरवाईच्या गर्द दाटीने नटला आहे. हिरवाई अन् निसर्ग सौंदर्याने ओथंबून भरलेले हे गर्द हिरवं जंक्शन मनाला भुरळ घालतं!

# पुणदी : १०० टक्के ठिबक



**पत्रकार विनायक कदम,**
लोढे (ता.तासगांव)
९६६५६५६७२३

दुष्काळ व पाणीटंचाइने सांगली जिल्ह्याचा दुष्काळी भाग होरपळत असताना दुष्काळग्रस्त तासगाव तालुक्यातील पुणदी गावात मात्र हिरवी गार शेती वाऱ्यावर डोलते आहे. गावात पाण्याची काहीच कमतरता नाही. या हिरवाईचं रहस्य आहे .. या गावाने केलेली १०० टक्के ठिबकावरची शेती. तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र पाटील यांनी ज्याची शेती ठिबकवर नाही त्याला पाणी व ग्रामपंचायतीच्या सुविधा मिळणार नाहीत अस फर्मानच काढत ग्रामपंचायतीत ठराव करून घेतला..आणि ही जलक्रांती झाली.

तासगाव तालुका दुष्काळाच कायम चटके बसलेला तालुका. मात्र यात तालुक्यातील एक गाव अपवाद होत, ज्यानं पाण्यासाठी कुणाकडेही हात पसरले नाहीत. उलट गावाने ठिबक सिंचनाचा पुरेपूर वापर करून राज्यातील दुष्काळी भागापुढं वेगळा पॅटर्न ठेवला. पुनदी तासगाव पासून जवळच असणारं दोन हजार लोकसंख्येच गाव. दुष्काळी. गावाचं ३ हजार एकर शिवार. गावात ५९ दशलक्ष घनफुट क्षमता असणारा तलाव..तरीही गावाला उन्हाळ्यात पाणी पुरत नव्हतं. गाव पाणी पाणी करायचं. गावचे तत्कालीन उपसरपंच रवी पाटील यांनी दुष्काळ कायमचा वेशीबाहेर नेण्यासाठी गावासमोर संपूर्ण ठिबक सिंचन युक्त करण्याचा प्रस्ताव मांडला. सर्वाना तो आवडला. सर्वानी होकार दिला. पण नुसताच गॉड बोलून काही फायदा नसतो. नुसतं सांगून कुणी ठिबक करणार नाही, यावर उपाय म्हणून असं न करणाऱ्याला तलावातुन पाणीच दयायच नाही.. त्याचा पाणी परवाना रद्द करून त्याला ग्रामपंचायतीच्या कोणत्याही सुविधा न देण्याचा ठरावच मांडला..आणि मात्रा बरोबर लागू पडली. ५ महिन्याच्या कालावधीत ८०% गाव ठिबक युक्त झालं. गावात कोणतेही पिक पाटाच्या पाण्यावर घेतल जात नाही. त्यामुळेच भर उन्हाळ्यात गावची शेती हिरवीगार आहे. तालुका व आजुबाजुची गाव पाण्यासाठी टाहो फोडत असताना पुनदी मात्र समृद्ध आहे. तलावात आज १०० विद्युत मोटारी आहेत, तरीही तलावात तालुक्यातील सर्वात जास्त पाणी साठा आहे. ताकारी योजनेच पाणी घेत तलाव वर्षातू न तीन वेळा भरला जातो. फक्त ठिबक सिंचन करूनही पाण्याची बचत होणार नाही. त्यासाठी कोणत्या पिकाला किती पाणी लागते याचा सर्वे आम्ही करत आहोत. सातबाऱ्यावर त्याच पिक व क्षेत्र पाहून त्याला तितकेच मोजून पाणी देणार असल्याचे सभापती रवींद्र पाटील यांनी सांगितले.

